# प्रेस नोट

## अपंग इसमाचा मोबाईल फोन व पाकीट चोरणा–या इसमास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा लोहमार्ग पोलीसांनी पकडून त्याचेकडून मोबाईल हॅन्डसेटस् व पाकीट रोख रक्कमेसह हस्तगत केले.

दि. ३१/०८/२०१७ रोजी पोलीस उप निरीक्षक, बबन गायकवाड, सहा.पो.फौ. भोसले, पो. हवा. सोनवणे, पो.शि. ४५० सुर्यवंशी, पो. शि. ६५ बोरनारे, पो. शि. १२० शिंदे, पो. शि. गवारी असे पुणे रेल्वे स्थानकावर गुन्हेगार वॉच करीत असताना १९:०० वाजनेच्या सुमारास पुणे रेल्वे स्टेशन प्लॅटफॉर्म नं. ३ वर उभ्या असलेल्या कोणार्क एक्सप्रेस गाडीचे जनरल डब्यावर प्रवाशी लोकांचे गर्दीत एक इसम प्रवासी लोकांचे सामानावर टेहळणी करीत असताना दिसला. त्यांची व पोलीस स्टाफची नजरानजर होताच तो पळुन जावु लागला. त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. त्यावेळी त्याने त्याचे नाव **नविद युनुस तांबोळी, वय २७ वर्षे, राह. गल्ली नं. १२, सय्यद नगर, हडपसर पुणे** असे सांगितले. त्यावेळी त्याचे अंगझडतीत पॅन्टचे खिशात एक सॅमसंग कंपणीचा मोबाईल व एक चॉकलेटी रंगाचे पाकीट असा एकुण २१,१००/– रू. किमतीचा मुद्देमाल मिळुन आला सदर मोबाईल व पाकीटाबाबत आम्ही त्याचेकडे सखोल चौकशी केली असता तो त्याबाबत काही एक समाधानकारक उत्तरे देत नसल्याने त्यास सी. आर. पी. सी. ४१(१)(ड) प्रमाणे ताब्यात घेतले.

चौकशी दरम्यान सदर आरोपीताजवळ मिळुन आलेल्या मोबाईलवरून मोबाईल धारकाचा शोध घेतला असता सदरचा मोबाईल व पाकीट नरेश तुकाराम उपलंची, वय ३५ वर्षे, राह. १०१४ भवानीपेठ, पुणे यांचे असल्याचे समजले. त्याबाबत त्यांचेकडे अधिक विचारपूस करता त्यांनी सांगितले की, ते दि. ३०/०८/२०१७ रोजी २३.३० ते २३.४५ वा.च्या दरम्यान राष्ट्भुषण चौक खडक, पुणे येथे दारूच्या नशेत असताना त्याचा मोबाईल फोन, पाकीट व त्यांची अपंगाची अॅक्टीव्हा होंडा कंपनीची गाडी क्र. एम.एच. १२ ईई ७८८५ अशी चोरीस गेली असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादी यांची फिर्याद घेवुन शुन्य नंबरने दाखल करून फिर्यादी, आरोपी व मुद्देमालासह खडक पोलीस ठाणे येथे पुढील कारवाई कामी पाठविण्यात आले आहेत.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक डॉ. प्रभाकर बुधवंत सो, मा. अप्पर पोलीस अधिक्षक तुशार पाटील सो, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अनिल दबडे, स्थानिक गुन्हे षाखा, लोहमार्ग पुणे, पोलीस उप–निरीक्षक बबन गायकवाड, सहा.पो.फौ. भोसले, पो. हवा. सोनवणे, पो.शि. ४५० सुर्यवंशी, पो. शि. ६५ बोरनारे, पो. शि. १२० शिंदे, पो. शि. गवारी या पथकाने केली आहे.